# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ )

*(आस्थापना विभाग)*


एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९२


क्र./आस्था/1644/२०१५ दि. : २८/०८/२०१५

प्रति,

मा. प्राचार्य,
संलग्नीत महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय**:– अपंगाच्या मागण्या मान्य करण्याबाबत...

**संदर्भ** :– शासन पत्र क्रं.संकीर्ण २०१५/प्र.क्र.१२७–२०१५/आस्था–२, दि. १०/८/२०१५.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार सदर पत्र, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव निर्देश केलेले आहे. सदर माहिती www.gondwana.digitaluniversity.ac, www.unigug.org या संकेत स्थळावर देण्यात आले आहे. सदर शासन पत्रानुसार कार्यवाही घेण्यात यावी.

(डॉ. विनायक इरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र

१.शासन पत्र
२.जिल्हा दंडाधिकारी लातुर यांचे कार्यालयाचे पत्र
३.प्रहार अपंग क्रांती आंदोलन संघटनेचे निवेदन

E/ vijaya/Handicap Letter/ 01

( सोबत " अपंगांच्या मागण्या मान्य करणेबाबत..." या विषयाबाबतचे जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय. क्र.२०१५/एमएजी/कक्ष-१/कावि-७७३.दि.१८.६.२०१५ रोजीचे पत्र व त्यासोबतचे प्रा. विनोद चव्हाण, जिल्हा संघटक व इतर प्रहार अपंग क्रांती आंदोलन लातूर यांचे दिनांक १७.६.२०१५ रोजीचे निवेदन...)

पृष्ठांकन क्र. संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.१२७-२०१५/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय , ४३१ ( विस्तार ), ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्रमांक - २२७९३०९८
दिनांक : १.८.२०१५

आवक क्र. 732 दि. 21/8/15
जावक क्र. 766 दि. 21/8/15

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आवक 1948 24/8/15

प्रति,

मा.प्रधान सचिव ( उच्च व तंत्रशिक्षण ) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव (व्यवसायशिक्षण / महाविद्यालयीन शिक्षण / विद्यापीठ शिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय).उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
कुलगुरु,सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
संचालक (उच्च शिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसायशिक्षण / व्यवसाप्रशिक्षण / कला / ग्रंथालय ),
(सोबतचे पत्र, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या / अधिका-यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात. ही विनंती )

( शीतल रा.कदम )
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन

DR
Establishment
21.8.15

Shi Burade
25/8

15/7/15

जिल्हाधिकारी लातूर करीता

१६५७१७

2/3/12

जिल्हादंडाधिकारी लातूर यांचे कार्यालय
(उपचिटणीस शाखा)

जा.क्र.२०१५/एमएजी/कक्ष-१/कावि-७७३ दिनांक - १८/०६/२०१५

23 JUN 2015

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन आस्था 2
दिनांक
बारनिशी क्रमांक 9B/ /2015

14/7/15
6396

प्रति,

१.कार्यासन अधिकारी,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
२.कार्यासन अधिकारी,
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग,
३.कार्यासन अधिकारी,
गृह विभाग,
४.कार्यासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

**विषय**- अपंगाच्या मागण्या मान्य करणेबाबत....

उपरोक्त विषयी प्रा. विनोद चव्हाण जिल्हा संघटक व इतर प्रहार अपंग क्रांती आंदोलन लातूर ता. जि. लातूर यांनी या कार्यालयास उक्त विषयासंदर्भात निवेदन सादर केले आहेत. सदर निवेदनांची मूळप्रत पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे.

15/7/15

Shri Burade
25/8

जिल्हाधिकारी लातूर करीता

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणेजो आपुले । तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा ।।



डॉ.संतोष मुंडे
राज्य समन्वयक

लढा अनाथ - अपंगाच्या हक्काचा...

# प्रहार अपंग क्रांती आंदोलन

जिल्हा समन्वयक - प्रा. विनोद चव्हाण
लातूर ता.जि.लातूर मो.9175980027



आ.बच्चु (भाऊ) कडू
संस्थापक अध्यक्ष

vinod.chavan43@yahoo.in vinod.chavan43@gmail.com

जा.क्र. दिनांक : 17/6/2015

प्रति,
मा. जिल्हाधिकारी साहेब,
जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

**विषय : अपंगाच्या मागण्या मान्य करणे बाबत..**

महोदय,

वरिल विषयी अनुसरुन निवेदन देण्यात येते की, गेली अनेक वर्षापासून अपंगाच्या कांही मागण्या प्रलंबीत आहेत त्यासाठी अपंगांनी अंदोलने केली परंतु तरी देखील शासनस्तरावर याची दखल घेतली जात नाही. अपंगानाही इतर समाजाप्रमाणे जिवन जगता यावे त्यांना सन्मान मिळावा यासाठी काही कायदे व नियमांची तरतुद शासनाने केलेली आहे परंतु तरी देखील याची अंमलबजावनी प्रभावी पणे केली जात नाही यासाठी प्रहार अपंग क्रांती अंदोलन च्या वतीने खालील मागण्यांचे निवदेन देत आहोत.

१. **अपंगाचा ३ % आरक्षणा प्रमाणे खाजगी शाळा व महाविद्यालयामध्ये नोकरीमध्ये ३ % कोटा न भरलेलया संस्थेवर कार्यवाही करुन अशा संस्थेचे अनुदान रोखावे व संस्थाचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत व अशा संस्थाची मान्यता रद्य करावी.**

२. **राज्यसभा, विधानपरिषद, नगरपरिषद व महानगर पालिकेमध्ये अपंगांना स्विकृत सदस्य म्हणून निवड करावी किंवा अपंगांसाठी ३ % आरक्षणाप्रमाणे राखीव मतदारसंघ ठेवावेत.**

३. **अपंग व्यक्तीच्या विवाहासाठी शासनाकडून मिळणा-या मानधनामध्ये वाढ करुन ते १ लाख पर्यन्त करावे.**

**स्थानिक स्वराज्य संस्थेचा (नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत) उत्पन्नाच्या ३ % निधी अपंगावर खर्च करने बंधन कारक करावे.**

**अपंगाना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी अपंगासाठी अॅट्रासिटी सारख्या कठोर कायदयाची तरतुद करावी.**

६. **अपंगाच्या ऑनलाईन प्रमाणपत्राची वाटप प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी करण्यात यावे.**

७. **अपंगाना स्वंयरोजगारासाठी बँकेकडून बिजभांडवल मिळवून देणे व त्यासाठी बँकेत राखीव कोठा ठेवावा व बँकेकडून अपंगाना कर्ज वाटपासाठी सहकार्य मिळावे.**

वरिल मागण्यांचा विचार लवकरात लवकर नाही झाल्यास संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| **प्रा. विनोद चव्हाण** | **शिवाजी सावंत** | **डॉ. रमेश भराडे** |
| **जिल्हा संघटक** | **निमंत्रक** | **निमंत्रक** |